# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५
## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा जिल्ह्यात शेगाव - खामगांव महामार्गावर दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास तीन वाहनांची धडक होऊन झालेल्या अपघातात सहा जण जागीच ठार तर २४ प्रवासी गंभीर जखमी होणे, जखमींवर खामगांवमधील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असून त्यातील सात जणांची प्रकृत्ती चिंताजनक असणे, सदर मार्गावर अपघाताचे वाढलेले प्रमाण, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, या अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री. अतुल भातखळकर, चेतन तुपे, सुनिल प्रभू, अजय चौधरी, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. मोहन मते, मनोज जामसुतकर, सुरेश धस, श्रीमती सना मलिक, श्री. महेश सावंत, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. संजय देरकर, सिध्दार्थ खरात, मुरजी पटेल, अमिन पटेल, अस्लम शेख, श्रीमती ज्योती गायकवाड, श्री. विकास ठाकरे, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, अमित विलासराव देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ मुंबईवरुन कर्जतकडे आणि कसारा येथून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या दोन जलद लोकल मुंब्रा स्थानकाच्या नजीकच्या वळणावर परस्परांशी झालेल्या घर्षणामुळे लोकलच्या दरवाज्यात लटकून प्रवास करणारे १३ प्रवासी खाली पडून झालेल्या अपघातात ४ प्रवाशांचा मृत्यू तर ९ जण जखमी झाल्याची दिनांक ९ जून, २०२५ रोजी घडलेली धक्कादायक घटना, मुंबईतील रेल्वेतील गर्दीत नागरिक जीव मुठीत घेऊन प्रवास करीत असणे, कधी चेंगरा-चेंगरीत तर कधी रेल्वे मार्ग ओलांडताना नागरिक मृत्युमुखी पडत असणे, मध्य रेल्वेवर सर्वाधिक अपघात मृत्यू ठाणे - कल्याण मार्गावर झालेले असणे, सन २०२४ मध्ये

धावत्या लोकलमधून ठाणे ते कल्याण दरम्यान ६१० जणांचा मृत्यू होणे, गेल्या ३ वर्षात मुंबई लोकलच्या प्रवासादरम्यान ७५६० प्रवासी मृत्युमुखी पडले तर ७२९३ जण जखमी झाल्याच्या घटना घडणे, मुंबईतील मध्य व पश्चिम रेल्वेची गर्दी कमी करुन वाढते अपघात रोखण्यासाठी सरकारी व खाजगी कार्यालयीन वेळेत बदल करण्याबाबत शासनाने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता,मुंबई शहरातील खासगी व सार्वजनिक कार्यालयांच्या कार्यालयीन वेळा टप्प्याटप्प्याने निश्चित करण्याकरिता धोरण आखून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. विनोद निकोले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पालघर जिल्ह्यामध्ये प्रशासकीय अधिकारी व ठेकेदार यांच्या हलगर्जीपणामुळे अत्यंत भीषण दुर्घटना घडणे, डहाणू तालुक्यातील चळणी ग्रामपंचायत हद्दीतील सुकड आंबा शिरसून पाडा येथे जलजीवन मिशन अंतर्गत जलकुंभाचे काम सुरु असणे, सदर बांधकाम ठेकदार व प्रशासकीय अधिकारी यांच्या संगनमताने अत्यंत निकृष्ठ दर्जाचे होणे, सदर जलकुंभाचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असणे, १७ मार्च, २०२५ रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास दोन शाळकरी मुली कुमारी हर्षला रशु बागी व रंजना प्रकाश राव सदर टाकीच्या परिसरामध्ये खेळण्यास जाणे, टाकीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट झाल्यामुळे स्लॅब वर खेळत असलेल्या मुली निकृष्ट दर्जाचा स्लॅब कोसळल्यामुळे ३० फुट उंचावरून खाली जमिनीवर आदळणे, या दुर्घटनेमध्ये दोन्ही मुलींचा दुर्दैवी मृत्यू होणे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये ठेकेदार व संबंधित अधिकारी यांच्या विषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे, ठेकेदार व जबाबदार वरिष्ठ अधिकारी यांच्या अक्षम्य हलगर्जीपणावर पांघरून घालण्यासाठी कनिष्ठ अभियंता यांच्यावर बडतर्फीची कारवाई करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होणे, या घटनेस जबाबदार असणारा सदर कामाचा ठेकेदार व वरिष्ठ अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून ठेकेदार व अधिकारी यांना जरब बसवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) सर्वश्री. अजय चौधरी, काशिनाथ दाते, सुधीर मुनगंटीवार, भास्कर जाधव, सुनिल प्रभू, अमित विलासराव देशमुख, विकास ठाकरे, संजय मेश्राम, गजानन लवटे, महेश सावंत, अनंत (बाळा) नर, राजेश पवार, डॉ.राहूल पाटील, सर्वश्री. संजय देरकर, सिध्दार्थ खरात, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील नागपूर व इतर अनेक जिल्हयात गेल्या काही वर्षात एकूण १ हजारांच्या वर अपात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नावे यादीत समावेश करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे, शालार्थ प्रणालीमध्ये ५८० अपात्र शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नावे सामिल करुन एकट्या नागपूर विभागात १०० कोटींच्या शासकीय निधीचा अपहार झालेला असणे, उक्त प्रकरणी संबंधित १२ शिक्षण संस्थांचे पदाधिकारी आणि शिक्षण विभागातील अधिकारी यांच्यावर गुन्हे

दाखल करण्याचे तसेच यासंदर्भातील चौकशीसाठी शिक्षण संचालक दर्जाच्या अधिका-यांची चौकशी समिती नेमण्याचे आदेश राज्याचे शालेय शिक्षण मंत्री यांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये दिलेले असणे, सन २०१२ पासून राज्यातील अनेक जिल्ह्यातील अपात्र शिक्षक पगार घेत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे या घोटाळयाची व्याप्ती फार मोठी असल्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवण्यात येणे, त्यामुळे या सर्व प्रकरणाची पारदर्शक चौकशी करण्यासाठी एसआयटीमार्फत चौकशी करुन दोषी आढळून येणा-यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

(५) **सर्वश्री. मोहन मते, सुधीर मुनगंटीवार, अमोल खताळ, रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. बापूसाहेब पठारे, चेतन तुपे, संजय पोतनीस, अमिन पटेल, अजय चौधरी, जयंत पाटील, सुनिल प्रभू, संजय केळकर, राजकुमार बडोले, मनोज जामसुतकर, महेश सावंत, विजय वडेट्टीवार, अनंत (बाळा) नर, योगेश सागर, राम कदम, ॲड. राहूल कुल, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. संजय देरकर, सिध्दार्थ खरात, डॉ. आशिषराव देशमुख, श्री. संतोष दानवे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील लोखंडी पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत ४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ५० पेक्षा अधिक पर्यटक जखमी झाले असल्याची हृदयद्रावक घटना दिनांक १५ जून, २०२५ रोजी घडली असणे, पर्यटकांचा अतिउत्साह आणि प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष याची परिणीती सदरहू दुर्घटनेत झाली असणे, कुंडमळा परिसरात पावसाळयात फुलून जाणाऱ्या निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो आबालवृद्धांची दर वर्षी गर्दी होणे, नदीच्या दोन्ही तीरांवरील गावांतील लोकांसाठी तीस-पस्तीस वर्षांपूर्वी सदरहू लोखंडी पूल बांधण्यात येणे, घटने दिवशी या भागात लोकांची उडालेली झुंबड, जीर्ण झालेल्या या पुलावर क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाल्याने पूल कोसळल्याचे निदर्शनास येणे, सदरहू पूल धोकादायक झाल्याने नवा पूल उभारण्याची स्थानिक नागरिकांकडून सातत्याने होत असलेली मागणी, बऱ्याच तक्रारी-पाठपुराव्यानंतर शासनाने गेल्या वर्षी पूलासाठी मंजूर केलेला निधी, मात्र प्रत्यक्ष कार्यादेश निघण्यास दीड वर्षाचा झालेला विलंब, सरकारी यंत्रणांनी आठ कोटी रुपयांचा नवा पूल उभारण्यासाठी केलेल्या लालफितशाही कारभार नागरिकांच्या जीवावर बेतला असल्याने राज्यभरातील जनतेत उमटलेली संतापाची लाट, यास्तव सदरहू दुर्घटनेतील मृतांच्या व जखमींच्या नातेवाईकांना तातडीने भरीव आर्थिक मदत देण्यासह सदरहू ठिकाणी नवीन पूल उभारण्याच्या कामात अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(६) श्री. चेतन तुपे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. मंगेश चव्हाण, अबू आझमी, योगेश सागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"टि.बी रुग्णसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी अनेक पातळयांवर प्रयत्न सुरु असले तरी अद्याप शासनाला त्यात यश न येणे, सन २०२५ च्या जानेवारी ते मे या ५ महिन्यांमध्ये राज्यात १७,३०,८०८ टि.बी रुग्ण संख्येची नोंद करण्यात येणे, यात विशेषत: १५ ते ३० वयोगटातील रुग्णसंख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येणे, या वयोगटामध्ये ३२,४९५ रुग्णसंख्येची म्हणजेच ३४% रुग्ण तरुण असल्याची नोंद होणे, सन २०२५ मधील पहिल्या ५ महिन्यांमध्ये ३१ ते ४५ या वयोगटामध्ये टि.बी रुग्णांची संख्या २३,९६४ इतकी असून हे प्रमाण २५.१% इतके असून ४६ ते ६० या वयोगटातील रुग्णांची संख्या १८,८३५ असणे, हे प्रमाण १९.६०% असणे,तसेच या वर्षी ४,७८४ लहान मुलांमध्ये टि.बी संसर्ग आढळून आला असून ते प्रमाण ५% असणे,महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये संसर्ग जास्त असल्याचे दिसून येणे, एकूण नोंदणीकृत ९५,४३७ रुग्णांपैकी ५५.२% पुरुष तर ४४.७% स्त्रीयांचा समावेश असणे, सन २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये रुग्णांमध्ये झालेली वाढ तर सन २०२४ च्या रुग्णसंख्येच्या प्रमाणात २०२५ च्या पाच महिन्यात झालेली रुग्णांची नोंद ही तुलनात्मक संख्या पाहता राज्यात २५ ते ३० वयोगटातील तरुणांना सर्वाधिक टि.बी लागण होण्याची होत असलेली वाढ, परिणामी राज्यातील जनतेमध्ये आरोग्यविषयक निर्माण झालेली चिंता व असंतोष लक्षात घेता या रोगावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची भूमिका."

**चार : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२५**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

**(ख) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२५**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५ नापसंत करते."

(ख) **सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सहावी सुधारणा) विधेयक, २०२५**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सहावी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सहावी सुधारणा) विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**पाच** : **सर्वश्री योगेश सागर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, सिध्दार्थ शिरोळे, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री दिपक केसरकर, विजय शिवतारे, संजय केळकर, संजय बनसोडे, रमेश बोरनारे, संभाजी निलंगेकर-पाटील, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश सुर्वे, शेखर निकम, ॲड.पराग अळवणी, राजेंद्र गावित, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री अतुल भातखळकर, प्रकाश सोळंके, प्रदीप जैस्वाल, प्रशांत ठाकूर, अशोक पाटील, अनिल पाटील, किसन कथोरे, शांताराम मोरे, राजकुमार बडोले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री दिलीप लांडे, महेंद्र थोरवे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, महेंद्र दळवी, डॉ.राहुल आहेर, श्री.तुकाराम काते, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री भिमराव तापकीर, निलेश राणे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री अमीत साटम, सुहास कांदे, सचिन पाटील,**

**रणधीर सावरकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मुरजी पटेल, राम कदम, विश्वनाथ भोईर, दिलीप बनकर, विलास तरे, शरद सोनवणे, कॅ. आर. तमील सेल्वन, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री राजेश मोरे, मिहिर कोटेचा, प्रवीण दटके, हिरामण खोसकर, पराग शाह, चंद्रकांत नवघरे, शंकर जगताप, कालिदास कोळंबकर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय उपाध्याय, कुमार आयलानी, मंगेश चव्हाण, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री नरेंद्र मेहता, महेश लांडगे, रविंद्र चव्हाण, अभिमन्यू पवार, डॉ. अतुल भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संतोष दानवे, हेमंत रासने, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर, ॲड. राहुल कुल, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, सुनिल कांबळे, सुरेश भोळे, विक्रम पाचपुते, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश वानखडे, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री विलास भुमरे, राजेश बकाने, समीर कुणावार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किशोर जोरगेवार, सुमित वानखेडे, हरिष पिंपळे, राघवेंद्र पाटील, शिवाजी कर्डिले, सर्वश्रीमती श्वेता महाले, मोनिका राजळे, सर्वश्री चैनसुख संचेती, समीर मेघे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री बबनराव लोणीकर, किर्तीकुमार भांगडिया, प्रशांत बंब, नारायण कुचे, राणाजगजितसिंह पाटील, प्रकाश भारसाकळे, राजू तोडसाम, सुरेश धस, राजेश पवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जितेश अंतापुरकर, डॉ. तुषार राठोड, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, सुभाष देशमुख, विजय देशमुख, मनोज घोरपडे, राहुल आवाडे, अमल महाडिक, धनंजय गाडगीळ, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकाशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना

भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठ्या शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळयाचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाडयांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे

रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री. हारुन खान, वि.स.स.**

"मुंबई महानगरपालिकेने वर्सोवा-भाईंदर किनारपट्टी मार्गासाठी आवश्यक परवानगी न घेता ठेकेदारांना सदरची कंत्राटे दिल्याबाबत" या विषयावरील श्री. भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २७ ला दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. मनोज जामसुतकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक जिल्ह्यांत बिबटे व वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत" या विषयावरील श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५० ला दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील."

**(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"कोसंबी रिठ (ता.पोभुर्णा, जि.चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांना एमआयडीसीकरिता संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला देणेबाबत" या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९१३ ला दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

**(सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ रोजी बॅलेटव्दारे काढण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्रमांक ४ व ५)**

**(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या शेतात लावण्यात आलेल्या सी. आर. आय. कंपनीच्या कृषी सोलर पंपाच्या तक्रारीबाबत" या विषयावरील श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४८१० ला दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

**(५) श्री. रईस शेख, वि.स.स.**

"कासिमपुरा, खंडू पाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील उस्मान शेठ इमारतीच्या शौचालयाच्या टाकीत पडून बालकाचा झालेला मृत्यु" या विषयावरील श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १९२८ ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३० जून, २०२५

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा